पुढारी

# जेव्हा आपली सावलीही साथ सोडते!

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आपली सावली कधीच आपली साथ सोडत नाही. परंतु, बुधवारी (दि. ६) जवळजवळ ५० सेकंदांपर्यंत आपली सावली अदृश्य झाली. खगोलशास्त्रामध्ये या घटनेला शून्य सावली अथवा झीरो शॅडो असे म्हणतात. या दिवसाचा अनेकांनी आनंद घेतला. अनेकांना आपली सावली गायब झाल्याचे दिसून आले. त्यामुळे अनेकांना त्याचे आश्चर्य वाटले. ५० सेकंदांनंतर सावली दिसू लागली. असाच दिवस ६ ऑगस्ट रोजी पुन्हा येणार आहे, अशी माहिती खगोलशास्त्राचे अभ्यासक डॉ. मिलिंद मनोहर कारंजकर यांनी दिली.

डॉ. कारंजकर म्हणाले, आज ६ मे हा झीरो शॅडो दिवस होता. या दिवशी १२ तासांची रात्र आणि १२ तासांचा दिवस असतो. दुपारी १२ वाजून २९ मिनिट ११ सेकंदाला शून्य सावली होण्यास प्रारंभ झाला. सावली हळूहळू माणसाच्या पावलात येऊ लागली, १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत ही सावली पूर्णपणे माणसाच्या पावलात गेली. त्यानंतर पुन्हा सावलीचा कल सुरू झाला आणि सावली दिसू लागली.





**कोल्हापूर : १) पंचगंगा नदीतील दीपमाळा व नदीतील मंदिराची झीरो शॅडोच्या वेळी सावली गायब झाल्याचे दिसत आहे. २) एक मुलगी उन्हात उभी राहिली असता सावली तिच्या पायामध्ये दिसत होती. (छाया : नाज ट्रेनर)**

कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन वृत्तांमध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोन वेळेला या शून्य सावलीचा आनंद घेता येतो. पृथ्वी ही कर्कवृत्तावरून बरोबर तीन महिन्याने वसंत संपात बिंदूपाशी येते. या दिवशी सूर्याची किरणे विषुववृत्तावर पडतात, त्यामुळे विषुववृत्तावर कुठेही उभारले, तरी आपली सावली काही काळासाठी नाहीशी होते. यानंतर बरोबर ३ महिन्यांनी मकरवृत्तावर, नंतर ३ महिन्यांनी पुन्हा विषुववृत्तावर आणि पुन्हा ३ महिन्यांनी कर्कवृत्तावर आपणास शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.